# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२९/१०/१७
## दि.२८/१०/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ८२६/१७,भादविक ३९९,४०२,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | गणेश कुताळ, पो.उप-निरी. येरवडा पोलीस स्टेशन पुणे |
| **आरोपी** | १.विशाल गणेश कसबे,वय-२३ वर्ष रा. स.नं.१२,लक्ष्मीनगर येरवडा,पुणे २.सागर गणेश कसबे,वय-२१ वर्ष,रा.सदर ३.निहाल जर्नादन लोंढे,वय-१९ वर्ष,रा.सदर ४. प्रफुल्ल गणेश कसबे,वय-१९ वर्ष,रा.सदर (अटक) व इतर दोन |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/१०/२०१७ रोजी ०२/०० वा. लक्ष्मीनगर भिमज्योत मंडळा जवळील खोलीमध्ये येरवडा |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी आप-आपसात संगनमत करून,मा.सह पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे पुणे पोलीस आयुक्तालयाचे क्षेत्रात शस्त्रे,सोटे,तलवारी,शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु जवळ बाळगण्यास बंदी आदेश असताना,त्यांनी सदर प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग करून,आपले कब्जात बेकायदेशीररित्या व अनधिकृतपणे लोखंडी तलवार,कोयते,मिरची पुड,नायलॉन रस्सी अशी एकुण १,०५०/- रुपये किंमतीची घातक शस्त्रे आपले जवळ बाळगुन,हत्याराची व साथीदारांची जमवाजमव करून,दरोडा टकाण्याची पुर्ण तयारी करून,सदर भागात दहशत निर्माण करून,येरवडा,कल्याणीनगर, विमाननगर परिसर किंवा पुणे शहर उपनगरात कोठेतरी स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी दरोडा टाकण्याचे तयारीत असताना अ.क्र.१ ते ४ मिळुन आले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. संतोष दराडे ९४२०६६७७८९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे २५३/१७,भादविक ३९२,५०६(२),३४ |
| **फिर्यादी** | भरत दुलेरा,वय-५१ वर्षे,रा.वाकडेवाडी,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/१०/२०१७ रोजी २३/३० वा. गुरुकृपा स्फुर्ती हौसिंग सोसा.मुंबई-पुणे रोड वाकडेवाडी,पुणे फिर्यादी यांचे राहते घराचे समोर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे जेवण केल्यानंतर त्यांचे राहते घरासमोर पायी फिरत असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ पत्ता विचारण्याचे बहाण्याने येवुन,फिर्यादी यांना चाकुचा धाक दाखवुन,त्यांचे गळयातील सोन्याची चेन ४०,०००/- रु किमतीची जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.बी.भोसले |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे २५२/१७,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | विजया मसुरकर,वय-६६,रा.खडकी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/१०/१७ रोजी दुपारी १२/०० ते दि.२२/१०/१७ रोजी १४/०० वा. चे दरम्यान ए/८,सोना अपार्टमेंट,औध रोड खडकी,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील ५ हजार ६५० रूपये रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकुण २,०९,५६० रू किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एन.व्ही.महाडिक |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १०३३/१७,भादविक ४५७,३८०,५११ |
| **फिर्यादी** | नरेंद्र राजपुत,वय-४५ वर्षे,कोंढवा,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/१०/१७ रोजी १८/३० वा. ते दि.२७/१०/१७ रोजी सकाळी ०५/०० वा.चे दरम्यान मौजे मांजरी-बुद्रुक,ता.हवेली,जि.पुणे गावातील मांजरी फार्म पोस्ट ऑफीस मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मांजरी फार्म पोष्ट ऑफीस मध्ये पोस्टमास्तर असुन,मौजे मांजरी-बुद्रुक, ता.हवेली,जि.पुणे गावातील मांजरी फार्म पोस्ट ऑफीस हे कुलुप लावुन बंद असताना, कोणीतरी अज्ञात इसमाने पोस्ट ऑफीसचे दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने तोडुन त्यावाटे आंत प्रवेश करुन,पोस्ट ऑफीसचे कपाट उघडुन,कपाटातील कागदपत्रे, शिल्लक राहलेली पत्रे ही अस्ताव्यस्त पसरवली तसेच भिंतीमध्ये बसवलेली लोखंडी तिजोरी भिंतीतुन काढुन,ती उघडण्याचा प्रयत्न करुन पोष्ट ऑफीस मध्ये चोरी करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. जगताप ९८२३२३७१७० |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दिघी पो स्टे २०६/१७,भादविक ३५३,३२३,५०४,३४ |
| **फिर्यादी** | पो.हवा. शेलार, दिघी पो स्टे पुणें शहर |
| **आरोपी** | १.स्वप्नील हनुमंत वाळके,वय-२७ २.एक महिला,वय-४८ ३.एक महिला,वय-२९,सर्व रा.दिघी जकात नाका,दिघी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/१०/१७ रोजी १०/४० दिघी पो स्टे पुणे शहर येथे |
| **तपशिल** | यातील नमुद अ.क्र.२ महिला हि तीचा मुलगा अ.क्रं.१ व मुलगी अ.क्रं.२ यांचे विरोधात तक्रार देण्यासाठी आली असताना,नमुद ठिकाणी त्यांचे आपसात झालेल्या भांडणा मध्ये फिर्यादी व इतर महिला पोलीस कर्मचारी यांनी त्यांना सोडविण्याचा प्रयत्न केला असता,सदर इसम व महिला यांनी फिर्यादी व महिला पोलीस कर्मचांरी यांचे अंगावर धावुन येऊन,त्यांना धक्का-बुक्की व शिवीगाळ करुन,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा आणला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. कदम ९०११०९४०४१ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे ३४७/१७,भादविक ४०६,४२०,३४,एम.पी.आय.डी.का.क.३,४ |
| **फिर्यादी** | जितेंद्र मुळेकर,वय-६५,रा.कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | एका नामांकीत बांधकाम ग्रुपचे संचालक व भागीदार- १.एक वयस्कर इसम,वय-६८ २.एक महिला,रा.शिवाजीनगर,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०९/२०१४ ते आजपावेतो शिवाजीनगर,पुणे येथील एका नामांकीत बांधकाम ग्रुपचे संचालक व भागीदार यांचे ऑफीस मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी नमुद एका नामांकीत बांधकाम ग्रुपचे संचालक एक वयस्कर इसम व महिला भागीदार यांचे कंपनी मध्ये ४,४०,६४७/- रुपये रक्कम मुदत ठेवी करीता गुंतविलेली असताना,त्यांनी फिर्यादी यांना मुदत ठेवीची रक्कम व त्यावरील व्याज परत न करता,फिर्यादी यांची वरील नमुद रकमेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. संजय कुरुंदकर, आर्थिक गुन्हे शाखा,पुणे शहर ८५५४०३५५५५ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चिंचवड पो स्टे २७२/१७,भादविक ३२४,बाल न्याय (मुलांची काळजी संरक्षण अधि.२०१५ चे क.७५) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३५,रा.चिंचवड,पुणे |

| | |
|---|---|
| **आरोपी** | खरात, पुर्ण नांव पत्ता नाही. |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/१०/१७ रोजी पुर्वी सात ते सात दिवस श्रीधरनगर,चिंचवड,पुणे येथील एका शाळे मध्ये |
| **तपशिल** | यातील नमुद श्रीधरनगर,चिंचवड,पुणे येथील एका शाळेतील शिक्षक खरात या इसमाचे सांगण्यावरुन,फिर्यादी यांचा अल्पवयीन मुलगा,वय-१० वर्षे याने आधार कार्ड नंबर आणला नाही याकारणावरुन,सदर इसमाने पिडीत मुलाचे पायावर लाकडी छडीने मारुन त्यास जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. यु.पी.देशमुख ९८५०३२९९२२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**